पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड
कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला,
चिंचवड पुणे ४११०३३
piplanning.pcpc-mh@gov.in

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/६५८२८५ /२०२४ पिंपरी-चिंचवड दिनांक- १५/०१/२०२४

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

आकुर्डी गावचे ग्रामदैवत/ कुलदैवत श्री खंडोबा मंदिर हे आकुर्डी खंडोबामाळ येथे असुन सदर ठिकाणी दिनांक १६/०१/२०२४ ते दिनांक १७/०१/२०२४ रोजी यात्रा भरणार असुन सदर यात्रा हि पंचक्रोशित प्रसिद्ध आहे. सदर यात्राकाळात खंडोबा मंदिरात अंदाजे दोन लाख भाविक दर्शनास येत असल्याने सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होवुन वाहतुक कोंडी होण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी विवेक पाटील, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे अधिसुचना तात्पुरते स्वरुपात निर्गमित करण्यात येत आहेत.

### निगडी वाहतुक विभाग अंतर्गत

१) थरमॅक्स चौकाकडुन येणारी वाहतुक ही आर.डी.आगा मार्गाकडुन गरवारे कंपनी कंपाऊंड पर्यंत येवुन तेथील टी जंक्शन वरुन खंडोबामाळ चौकाकडे न जाता ती डावीकडुन परशुराम चौकाकडुन मोहननगर चिंचवड मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) परशुराम चौकाकडुन येणारी वाहतुक हि खंडोबामाळ चौकाकडे न येता ती परशुराम चौकातुन आर.डी आगा मार्गे गरवारे कंपनी कंपाऊंड टी जंक्शन वरुन उजवीकडे वळुन इच्छित स्थळी जातील.

३) चिंचवड, दळवीनगर व आकुर्डी गावठाणातुन येणाऱ्या वाहनांना खंडोबामाळ चौकाकडुन थरमॅक्स चौकाकडे जाण्यास प्रवेश बंद करण्यात येत असुन सदरची वाहणे हि टिळक चौक/ शिवाजी चौक बाजुकडे वळुन इच्छितस्थळी जातील.

४) टिळक चौकाकडुन येणाऱ्या वाहनांना खंडोबामाळ चौकातुन थरमॅक्स चौक बाजुकडे जाण्यास प्रवेश बंद करण्यात येत असुन सदरची वाहने सरळ चिंचवड स्टेशन/दळवीनगर मार्गे इच्छितस्थळी जातील

तरी वरील प्रमाणे दि. १६/०१/२०२४ ते दि. १७/०१/२०२४ रोजी पहाटे ०५.०० ते २२.०० वा. चे दरम्यान आवश्यकतेनुसार वाहतुक वळविणेबाबत अधिसुचना (नोटीफिकेशन ) काढण्यात येत आहे.

१५/१

(विवेक पाटील)
पोलीस उप-आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी निगडी वाहतुक विभाग
/- वाहतूक बदलाचे अनुषंगाने योग्य तो पोलीस बंदोबस्त लावण्यात यावा.

Scanned with CamScanner